# हवामान आधारीत कृषि सल्ला

## जिल्हा कृषि हवामान केंद्र, ग्रामीण कृषि मौसम सेवा
## डॉ. हेडगेवार सेवा समिती, कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार

**दूरध्वनी : ०२५६४ २६०५४४/९६५७३२३३३४** **ईमेल: kvk_ndb@yahoo.com**

**३६) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ०४/०८/२०२०**

**जिल्हा : नंदुरबार**

| मागील आठवड्यातील हवामान (२८/०७/२०२० ते ०३/०८/२०२०) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (०५/०८/२०२० ते ०९/०८/२०२०) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २८ | २९ | ३० | ३१ | ०१ | ०२ | ०३ | दिनांक | ०५ | ०६ | ०७ | ०८ | ०९ |
| | | | | | | | पाऊस (मिमी) | ३२ | ७४ | २४ | १६ | २६ |
| | | | | | | | कमाल तापमान (अं.से.) | ३४ | ३३ | ३१ | ३० | ३० |
| | | | | | | | किमान तापमान (अं.से.) | २३ | २४ | २४ | २५ | २४ |
| | | | | | | | ढग स्थिती (आकाश) | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ |
| | | | | | | | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ७८ | ८७ | ८७ | ८६ | ८७ |
| | | | | | | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ४८ | ५७ | ७१ | ६१ | ६४ |
| | | | | | | | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ०७ | १४ | १७ | १४ | १८ |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषी विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान अंदाज सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार, नंदुरबार जिल्ह्यात ५ आणि ६ ऑगस्टला अक्कलकुवा, अक्राणी तालुक्यात बऱ्याच ठिकाणी तर शहादा, तळोदा तालुक्यात काही ठिकाणी मध्यम ते जोरदार आणि नवापुर, नंदुरबार तालुक्यात तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. दि. ९ ते १५ ऑगस्ट दरम्यान मध्य महाराष्ट्रात सरासरी पेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | पुढील तीन दिवसासाठी जिल्ह्यातील विशेत: अक्कलकुवा, अक्राणी, शहादा, तळोदा तालुक्यात पिकांना पाणी, खते देणे, कोळपणी तसेच इतर शेतात कामे आणि किटनाशक, तणनाशक फवारणी करणे टाळावे. फवारणी वारा शांत असताना करावी. फवारणी करताना स्टीकरचा वापर करावा. सर्व पिके वेळेवर आंतरमशागत करून तणविरहीत ठेवा. किडीचा आणि रोगांचा प्रादुर्भाव होऊ नये वेळेवर पीक संरक्षण करा. पेरलेल्या पिकास शिफारशीप्रमाणे वरखतांचा हप्ता द्यावा. |
| संदेश | | पुढील पाच दिवसात जिल्ह्यात काही ठिकाणी मध्यम ते जोरदार स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. |
| कापूस | पाते लागणे ते फुले उमलणे | पावसाचा अंदाज असल्याने पुढील तीन दिवसानंतर बागायती बीटी आणि बिगर बीटी कापूस लागवडीनतर प्रत्येकी ६० दिवसानी नत्र खताचा तिसरा हप्ता ५० किलो व ४० किलो नत्र प्रति हेक्टरी पावसाचा अंदाज असल्याने पुढील तीन दिवसानंतर द्यावा. शेतात पाणी साचू न देता अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| सोयाबीन | वाढीची अवस्था | शेतातील कीडग्रस्त झाडे, पाने, फांद्या यांचा आतील किडींसह नायनाट करावा. घाटेअळी व स्पोडोप्टेरा यांची प्रादुर्भावाची पातळी समजण्यासाठी सर्वेक्षणासाठी प्रत्येक किडीसाठी एकरी २ कामगंध सापळे शेतात लावावेत. शेतात इंग्रजी 'T' अक्षरासारखे पक्षी थांबे लावावेत. शेतात पाणी साचू न देता अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| मका | वाढीची अवस्था | पावसाचा अंदाज असल्याने पुढील तीन दिवसानंतर मका पिकात पेरणीनंतर ३० दिवसांनी ४० किलो नत्र प्रति हेक्टरी द्यावे. खोडमाशीचा प्रादुर्भाव दिसून येताच डायमेथोएट ३० ई.सी. हेक्टरी ११५५ मिली ५०० ते १००० लिटर पाण्यातून फवारणी करावी. शेतात पाणी साचू न देता अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| तूर | फांद्या फुटण्याची अवस्था | पावसाचा अंदाज असल्याने पुढील तीन दिवसानंतर तूर पिकात पाने गुंडाळणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी ॲझाडीरेक्टीन (१५०० पीपीएम) ५ मि.लि. प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसेच प्रती हेक्टरी ५ या प्रमाणात कामगंध सापळे ठेवून घाटे अळी, पिसारी पतंग इ. किडीच्या प्रादुर्भावाचा अंदाज घ्यावा. शेतात पाणी साचू न देता अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| आडसाली ऊस | लागवण | पावसाचा अंदाज असल्याने पुढील तीन दिवसानंतर आडसाली ऊस लागणीच्या ४०:८५:८५ नत्र स्फुरद पालाश किलो प्रति हेक्टरी द्यावे. आडसाली उसामध्ये भुईमुग, चवळी, सोयाबीन, भाजीपाला इत्यादी आंतरपिके घेता येतात. शेतात पाणी साचू न देता अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| मिरची | वाढीची अवस्था | पावसाचा अंदाज असल्याने पुढील तीन दिवसानंतर चुरडा मुरडा (लिफ कर्ल) या विषाणूजन्य रोगाच्या |

# हवामान आधारीत कृषि सल्ला

## जिल्हा कृषि हवामान केंद्र, ग्रामीण कृषि मौसम सेवा
## डॉ. हेडगेवार सेवा समिती, कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार

**दूरध्वनी : ०२५६४ २६०५४४/९६५७३२३३३४** **ईमेल: kvk_ndb@yahoo.com**

| | | |
|---|---|---|
| | | नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रिड १७.८ % एस.एल.५ मिली किंवा फिप्रोनिल ५ एस.सी. १५ मिली. प्रती १० लिटर पाण्यातून फवारावे. फवारणी करतांना चिकट द्रव्याचा (०.१%) वापर करावा. शेतात पाणी साचू न देता अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| कांदा | वाढीची अवस्था | रस शोषक किडीच्या नियंत्रणासाठी एकरी २५-३० पिवळे चिकट सापळे लावावेत. बुरशीजन्य करपा रोगाला प्रतिबंध म्हणून शेतात पाणी साठू देवू नये. शेतात पाणी साचू न देता अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| केळी | वाढीची अवस्था | पावसाचा अंदाज असल्याने पुढील तीन दिवसानंतर करपा (सिगाटोका) : बाग आणि बांध नेहमी तणमुक्त आणि स्वच्छ ठेवावेत. रोगाची प्राथमिक लक्षणे दिसताच, मँकोझेब (७५ डब्ल्यूपी) २.५ ग्रॅम किंवा कॉपर ऑक्सीक्लोराईड (५० डब्ल्यूपी) २.५ ग्रॅम प्रतिलिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. प्रादुर्भाव जास्त झाल्यास, प्रॉपीकोनॅझोल (२५ ईसी) १ मिलि प्रतिलिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. शेतात पाणी साचू न देता अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| पपई | वाढीची/फलधारणा अवस्था | शेतात पाणी साचल्याने रूट रॉट / फूट रॉट रोगाचा पपईच्या झाडावर प्रादुर्भाव दिसून आल्यास कॉपर ऑक्सीक्लोराईड २ ग्रॅम / लिटर पाण्यात किंवा बोर्डीक्स मिश्रणासह १% किंवा मेटॅलेक्झील १ ग्रॅम / लिटर पाण्याने आळवणी करून घ्यावी. प्रादुर्भाव ग्रस्त झाडे काढून जाळून नष्ट करावीत. शेतात पाणी साचू न देता अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| आंबा | वाढीची अवस्था | पावसाचा अंदाज असल्याने पुढील तीन दिवसानंतर नवीन पालवीवर शेंडा पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी सुरवातीस प्रादुर्भाव कमी असताना कीडग्रस्त पालवी किडीच्या अवस्थेसह काढून नष्ट करावी. किडीच्या नियंत्रणासाठी, क्लोरपायरीफॉस (२० ईसी) २ मि.लि. किंवा लॅमडा सायहॅलोथ्रीन (५ ईसी) ०.६ मि.लि. प्रति लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येताच, कार्बेन्डाझिम (५० डब्ल्यूपी) १ ग्रॅम किंवा थायोफिनेट मिथाईल (७० डब्ल्यूपी) १ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. शेतात पाणी साचू न देता अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| पशूसंवर्धन | - | पावसाळ्यात ओल्या आणि कोवळ्या हिरव्या चाऱ्याचे प्रमाण अधिक असल्याने जनावरांना योग्य त्या प्रमाणात हिरवा चारा खाऊ घालावा म्हणजे जनावरांना पोटफुगी होणार नाही. तसेच पावसाळ्यात साचलेल्या गढूळ पाण्याचे प्रमाण अधिक असल्याने जनावरांना हगवण होणार नाही याची काळजी घ्यावी. |
| कुक्कुटपालन | - | पावसाच्या पाण्यामुळे आणि हवेतील जास्त आद्रेतेमुळे बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भावापासून संरक्षणासाठी पाणी शेडमध्ये येऊ नये यासाठी प्लॅस्टिक पडदे वापरावेत. हवा खेळती राहण्यासाठी पाऊस नसताना पडदे उघडे ठेवावेत. पक्ष्यांना स्वच्छ पाणी प्यावयास द्यावे, त्यासाठी योग्य निर्जंतुकीकरण करणारी औषधे वापरावीत. |

स्त्रोत
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान :

ठिकाण : कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार
दि. : ०४/०८/२०२०

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्रामीण कृषि मौसम सेवा-जिल्हा कृषि हवामान केंद्र, कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार**